भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१९/०३/२०१८९

# प्रेसनोट

## अपघाताचा बनाव करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारे दोघे अटकेत

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.१३/०३/२०१९ रोजी पहाटे ०५.३० वा.सुमारास ओमकार लॉजचे अलीकडे, आंबेगाव खु सर्व्हिस रोड, मुंबई बंगलोर हायवे लगत, इसमनामे बाळासाहेब सोपान वनशिव वय-५२ वर्षे रा.सदर व त्यांचा मित्र प्रकाश बाबुराव टिळेकर रा.सदर हे पायी फिरण्यासाठी गेले असता, पांढरे रंगाची पोलो कारसारखी कार, हि आंबेगाव खु सर्व्हिसरोडने दोन ते तीन वेळा संशयितरित्या फिरुन, बाळासाहेब वनशिव व त्यांचे मित्र प्रकाश टिळेकर हे व्यायाम करुन सर्व्हिसरोडच्या कडेने कठड्यालगत डावे बाजुने पायी घराकडे येत असताना पोलो कारचालकाने पाठीमागून जोरात येवून बाळासाहेब वनशिव यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने जोरात धडक देवून गंभीर जखमी केले आहे.त्याबाबत भारती विद्यापिठ पोलीस ठाणे गु.रजि.नं-२२६/२०१९ भा.द.वि कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दि.१८/०३/२०१९ रोजी सदर गुन्हयाचे अनुषंघाने गुन्हयातील आरोपीचा पो.उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे स्टाफसह शोध घेत असताना पेट्रोलींग करीत करीत कात्रज चौक येथे आले असता **सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव,व पोलीस कॉन्स्टेबल जगदीश खे्डेकर** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वरील दाखल गुन्हयातील फिर्यादी यानी अविनाश कांबळे यांचेवर संशय व्यक्त केला होता सदर अविनाश कांबळे व त्याचा मित्र नितीश थोपटे या दोघांनी सदरचा गुन्हा केला असून ते दोघेही जिल्हा परिषद शाळा कोळेवाडी येथे थांबलेले आहेत.अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने तपास पथकाने सदरची बातमी वरिष्ठांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर सोबतचे स्टाफसह कात्रज चौक येथुन खाजगी वाहनाने रवाना होवुन बातमीचे ठीकाणाजवळ जावुन वॉच केला असता बातमीतील वर्णनाचे इसम हे जिल्हा परिषद शाळेचे भिंतीजवळ थांबलेले असताना दिसलेने त्यास स्टाफचे मदतीने पकडुन त्यांना नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव पत्ता **१) अविनाश कैलास कांबळे वय-३९वर्ष रा.विठ्ठल कलावती निवास जिल्हा परिषद शाळेशेजारी न-हे गाव ता.हवेली जि.पुणे २) नितीश सतिष थोपटे वय-३० वर्ष राथोपटे बिल्डींग अंबाईमाता मदीर धायरी गाव पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे दाखल गुन्हयाबाबत विचारपूस करता त्यांनी दोघांनी त्याचा मित्रनामे रोहीत पवार रा.न-हे गाव याची पोलो गाडी वापरून गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, दाखल गुन्हयाचा योग्य व सखोल तपास करणेकामी वरील दोघांना अटक करण्यात आलेली आहे.

आरोपींनी अपघाताचा बनाव करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेचा गुन्हा भारती विद्यापिठ पोलीस ठाणेकडील तपास पथकाने उघडकीस आणलेला आहे.यातील मुख्य आरोपी अविनाश कांबळे हा माजी सरपंच (न-हे गाव)यांचा पती असून त्याची पत्नी २०१८ च्या न-हे गावच्या सरपंच पदाच्या निवडणुकीमध्ये बाळासाहेब वनशिव यांच्या पत्नी कडून हारल्याने त्याचा राग मनात धरून मित्रासह न-हे गावच्या सध्याच्या सरपंच यांचे पती बाळासाहेब वनशिव यांचे अंगावर चारचाकी कारने अपघाताचा बनाव करून ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.व्ही.पी.नांदेडकर सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे ,स.पो.निरी नलवडे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक महेंद्र पाटील ,सहा.पो.उप-निरीक्षक प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,उज्वल मोकाशी,प्रणव सकपाळ,शिवदत्त गायकवाड,जगदीश खे्डकर यांचे पथकाने केलेली** आहे.

पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे